**ठळक बातम्या**

- विधानसभा अध्यक्षपदी राहुल नार्वेकर यांची बिनविरोध निवड
- राज्य विधानसभेत महायुती सरकारवरचा विश्वासदर्शक ठराव आवाजी मतदानानं मंजूर
- विविध मुद्द्यांवरून विरोधकांनी केलेल्या गदारोळामुळे संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज दुपारी ३ वाजेपर्यंत तहकूब
- भारतीय नौदलाच्या तुशील या युद्धनौकेचं जलावतरण संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या हस्ते आज होणार
- **आणि**
- उत्तरेकडून वाहणाऱ्या थंड वाऱ्यांमुळे राज्यात थंडीचं पुनरागमन

**<><><><>**

महाराष्ट्र विधानसभेच्या अध्यक्षपदी राहुल नार्वेकर यांची आज बिनविरोध निवड झाली. हंगामी अध्यक्ष कालीदास कोळंबकर यांनी त्यांच्या नावाची घोषणा केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसंच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी अध्यक्षपदासाठी नार्वेकर यांच्या नावाचा प्रस्ताव ठेवला होता, त्यांच्याविरोधात अन्य कोणीही उमेदवार नसल्याने हा प्रस्ताव सभागृहाने आवाजी मतदानानं मंजूर केला.

त्यानंतर मुख्यमंत्री आणि दोन्ही उप-मुख्यमंत्र्यांनी तसंच जयंत पाटील आणि नाना पटोले यांनी अध्यक्ष राहुल नार्वेकर यांचं अभिनंदन केलं. नार्वेकर

यांची ओळख विद्वान आणि संयमी अशी असून राज्याच्या इतिहासात सलग दोनदा पद भुषवणारे ते चौथे व्यक्ती आहेत, असं देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या भाषणात सांगितलं. आधीच्या कार्यकाळात अध्यक्षांनी ज्याप्रकारे निःपक्षपातीपणे कामकाज चालवलं तीच परंपरा पुढे सुरू राहील असंही फडणवीस म्हणाले.

त्याआधी सभागृहाचं कामकाज सुरू झाल्यावर हंगामी अध्यक्ष कालीदास कोळंबकर यांनी जयंत पाटील, विनय कोरे, सुनील शेळके आणि उत्तम जानकर यांना विधानसभा सदस्यत्वाची शपथ दिलं. तसंच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांचा परिचय करून दिला.

**<><><><>**

मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारचा विश्वासदर्शक ठराव आज विधानसभेत आवाजी मतदानाने मंजूर झाला. विधानसभा सदस्य उदय सामंत, दिलीप वळसे पाटील, संजय कुटे आणि रवी राणा यांनी मुख्यमंत्र्यांच्या मंत्रिमडळावर विश्वास दर्शवणारा ठराव सभागृहात मांडला होता, तो सभागृहाने आवाजी मंजूर केला.
त्यानंतर विधानसभेचं कामकाज स्थगित झालं असून आता सायंकाळी राज्यपालांच्या अभिभाषणाने कामकाज पुन्हा सुरू होईल. दरम्यान, विधानसभेच्या अध्यक्षपदाची निवडणूक बिनविरोध झाली असली तरी आता

विरोधी पक्षाबाबत निर्णय घ्यावा, अशी मागणी काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे. ते म्हणाले…

**होल्ड बाईट - विजय वडेट्टीवार**

**<><><><>**

झारखंड विधानसभेचं विशेष अधिवेशन आजपासून सुरु झालं.  नवनिर्वाचित सदस्यांचा शपथविधी आज होत असून उद्या विधानसभा अध्यक्षांची निवडणूक होईल, त्यानंतर हेमंत सोरेन सरकारच्या विश्वासदर्शक ठरावावर मतदान घेतलं जाईल, बुधवारी राज्यपालांच अभिभाषण होईल आणि त्यानंतर राज्याचा पुरवणी अर्थसंकल्प सादर केला जाईल.

**<><><><>**

विविध कारणांवरून विरोधकांनी केलेल्या गदारोळामुळे आजही वारंवार अडथळे निर्माण झाल्याने संसदेच्या कामकाज तीन वेळा तहकूब झालं.
लोकसभेत आज विरोधी पक्षांनी अदानी उद्योगसमूहावरच्या तथाकथित लाचखोरीच्या आरोपांवरून गदारोळ केला. प्रश्नोत्तराच्या तासात इतर मुद्दे उपस्थित करता येणार नाहीत, असं लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी सांगितल्यावर गदारोळ वाढला, त्यामुळे लोकसभेचं कामकाज आज दुपारी ३ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं.
त्यापूर्वी संसद भवन परिसरातही विरोधकांनी या मुद्द्यावरून निदर्शनं केली. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, लोकसभेतले विरोधी पक्ष नेते राहुल गांधी,

डीएमकेचे टी. आर. बालू, आरजेडी चे मनोज झा इत्यादी नेते यात सहभागी झाले होते.

राज्यसभेत सत्ताधारी तसंच विरोधी पक्षांनी विविध कारणांवरून दिलेल्या तहकुबीच्या नोटीस अध्यक्ष जगदीप धनखड यांनी फेटाळून लावल्या. सभागृहाचं कामकाज नीटपणे चालू देण्याचा आग्रह त्यांनी धरला. मात्र गदारोळ चालूच राहिल्यानं राज्यसभेचं कामकाजही दुपारी तीन वाजेपर्यंत तहकूब झालं.

**<><><><>**

देशातल्या लघु आणि अल्प भू धारक शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या कर्जांमध्ये गेल्या तीन वर्षांत वाढ झाली आहे, अशी माहिती केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज एका लेखी उत्तरात दिली. २०२१-२२ या आर्थिक वर्षात लघु आणि अल्प भूधारक शेतकऱ्यांना ११ कोटी ६७ लाख रुपयांच्या कर्जाचं वितरण झालं तर २०२३-२४ या आर्थिक वर्षात तेरा कोटींहून अधिक रुपयांची कृषीकर्जं मंजूर करण्यात आली, असं त्यांनी म्हटलं आहे.

**<><><><>**

देशातल्या आदिवासी भागांच्या विकासासाठी नाबार्डकडून निधी पुरवला जात असून गेल्या १८ वर्षांत १ हजार २९ प्रकल्प मंजूर झाले असल्याचं आज केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी लोकसभेत एका लेखी उत्तरात सांगितलं. आदिवासी विकास निधी योजनेअंतर्गत दिल्या जाणाऱ्या

या निधीतून आतापर्यंत ६ लाखांहून अधिक कुटुंबांना लाभ मिळाला असल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><>

रशियाच्या कॅलिनीनग्राड इथल्या यंत्रा बंदरात भारतीय नौदलाच्या बहुपयोगी, क्षेपणास्त्र सज्ज, अत्याधुनिक आयएनएस तुशील या युद्धनौकेचं जलावतरण संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांच्या हस्ते आज होणार आहे. यावेळी नौदल प्रमुख ॲडमिरल दिनेश त्रिपाठी देखील उपस्थित असतील. संरक्षण मंत्री सिंग यांचं काल रात्री तीन दिवसांच्या रशियाच्या दौऱ्यावर आगमन झालं आहे. ते आज होणाऱ्या उभय देशांच्या लष्करी आणि लष्करी तंत्रज्ञानविषयक सहकार्यावरच्या आंतर-सरकारी आयोगाच्या २१व्या बैठकीचं रशियाचे संरक्षण मंत्री आंद्रे बेलोसोव्ह यांच्यासोबत सहअध्यक्षपद भूषवतील. औद्योगिक सहकार्यासह दोन्ही नेते उभय देशांच्या लष्करी, संरक्षण क्षेत्रातल्या बहुआयामी संबंधांचा आढावा घेतील. तसंच परस्पर हिताच्या समकालीन प्रादेशिक तसंच जागतिक मुद्द्यांवर वैचारिक देवाणघेवाण करतील. संरक्षण मंत्री यावेळी मॉस्कोमध्ये दुसऱ्या महायुद्धात वीरमरण प्राप्त झालेल्या सोव्हिएत सैनिकांना द टॉम्ब ऑफ द अननोन या समाधीस्थळी श्रद्धांजली वाहतील. तसंच स्थानिक भारतीय समुदायाशीही संवाद साधतील.

<><><><>

भारतात येणाऱ्या काळात तरुणांची संख्या सर्वात जास्त असणार असून या तरूणांच्या कौशल्यविकासावर शासन भर देत असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र

मोदी यांनी म्हटलं आहे. राजस्थानमध्ये जयपूर इथं होत असलेल्या रायझिंग राजस्थान या वैश्विक गुंतवणूक परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते संबोधित करत होते. तंत्रज्ञान आणि इंटरनेटच्या साहाय्यानं लोकशाही, लोकसंख्याशास्त्र आणि डेटा पॉवर या क्षेत्रांमध्ये भारताची ताकत सध्या वाढली आहे. तसंच गेल्या दहा वर्षात भारत जगातली पाचवी सर्वांत मोठी अर्थव्यवस्था बनली असून भारताच्या एफडीआय आणि निर्यात क्षेत्रामध्ये दुपटीनं वाढ झाली आहे, असंही ते यावेळी म्हणाले.

**<><><><>**

दिल्लीच्या शंभू सीमेवर सुरु असलेल्या शेतकरी आंदोलनासंबंधी नवी याचिका दाखल करून घेण्यास सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला आहे. यासंबंधात न्यायालयात आधीच याचिका प्रलंबित असल्याने त्याच मुद्द्यावर नवी याचिका न्यायालय स्वीकारणार नाही असं न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील पीठाने आज नमूद केलं आहे.
आंदोलनासाठी महामार्गांवर अडथळे आणणे हा राष्ट्रीय महामार्ग कायद्यानुसार गुन्हा आहे आणि म्हणून न्यायालयाने आंदोलनकर्त्यांना हटवण्याचे आदेश द्यावेत यासाठी ही याचिका दाखल करण्यात आली होती.

<><><><>

संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी आज देशविरोधी शक्तींचा एकजुटीनं सामना करण्याचं आवाहन काँग्रेस आणि इतर विरोधी पक्षांना केलं. ते आज नवी दिल्लीत प्रसारमाध्यमांशी बोलत होते. प्रत्येक मुद्दा राजकीय भिंगातून बघितला जाऊ नये, असं ते म्हणाले. जॉर्ज सोरोस फाऊंडेशन आणि एका ज्येष्ठ  विरोधी नेत्याचे संबंध असल्याचं सार्वजनिक माध्यमातल्या अहवालावरून स्पष्ट होत आहे, असा आरोप त्यांनी केला.

<><><><>

गेले काही दिवस उकाडा जाणवत असताना कालपासून राज्यात थंडीचं पुनरागमन झालं आहे. अरबी समुद्रावर तयार झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे ढगाळ हवामान तयार होऊन अवकाळी पाऊस पडला तसंच तापमानात वाढ झाली होती. मात्र, उत्तरेकडून वाहणाऱ्या थंड वाऱ्यामुळे मुंबईसह नाशिक, पुणे इत्यादी भागात थंडीचा जोर  वाढला आहे. मुंबईतील सांताक्रुज केंद्रावर तापमान १३ पूर्णांक ७ दशांश अंश सेल्सिअस, नाशिक शहरात ९ पूर्णांक ४ दशांश तर निफाडमध्ये ६ पूर्णांक ७ दशांश अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे. येत्या काळात तापमान आणखी कमी होईल अशी शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे.

//<><><><>//